# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- १९३ दिनांक :- २३/१०/२०२६

## " पहूर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी! पिंपळगाव गोलाईत येथील चोरीस गेलेली बैलजोडी हस्तगत; गुरे चोरीचा गुन्हा उघडकीस "

**पहूर पोलिसांनी पिंपळगाव गोलाईत शिवारातून चोरीस गेलेली बैलजोडी हस्तगत करून चोरीचा गुन्हा उघडकीस आणला असुन, या कारवाईत दोन बैल व चोरीसाठी वापरलेला टेम्पो असा एकूण २,८५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सायंकाळी १९:०० वाजेच्या सुमारास पिंपळगाव गोलाईत शिवारातील शेत गट क्रमांक १०७ मधून फिर्यादी यांच्या मालकीचे मावळी जातीचे, पांढऱ्या रंगाचे, सरळ व लांब शिंगे असलेले, अंदाजे ७ ते ८ वर्षे वयाचे दोन बैल, एकूण किंमत १,०५,०००/- रुपये असे अज्ञात इसमाने लबाडीच्या इराद्याने चोरून नेले होते. याप्रकरणी **पहूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १८७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी पहुर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रविण दातरे यांना सदर गुन्ह्याचा तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना दिल्या. त्यानुषंगाने सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रविण दातरे यांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक सूचना देऊन तपास पथक कार्यरत केले.

सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, **आरोपी १) संजय प्रल्हाद पाटील २) ज्ञानेश्वर गणपत पाटील, दोन्ही रा. सोनाळा, ता. जामनेर, जि. जळगाव** यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिल्यानंतर त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी त्यांचे **साथीदार दिनेश उर्फ टेलर जगन्नाथ पाटील व ईश्वर कडू पाटील** यांच्या मदतीने सदर बैलजोडी चोरल्याची कबुली दिली. तसेच चोरी केलेली बैलजोडी सुनसगाव येथील पिंटू नावाच्या व्यापाऱ्याला विकल्याचे सांगितले.

त्यानुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण दातरे, पोलीस उपनिरीक्षक गणेश सुस्ते व पोलीस पथकाने **सुनसगाव** येथे जाऊन माहितीची खातरजमा केली असता, चोरीस गेलेली बैलजोडी **पिंटू उर्फ नरेंद्र प्रल्हाद गोखरे, रा. सुनसगाव, ता. जामनेर** यांच्या शेतात मिळून आली. पोलिसांनी सदर बैलजोडी हस्तगत करून मूळ मालकाच्या ताब्यात दिली आहे. तसेच चोरीचा माल खरेदी केल्याप्रकरणी पिंटू उर्फ नरेंद्र प्रल्हाद गोखरे याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

## -: जप्त मुद्देमालाचा तपशील :-

| अ.क्र. | मुद्देमालाचे वर्णन | किंमत |
|---|---|---|
| ०१ | मावळी जातीचे पांढऱ्या रंगाचे, सरळ व लांब शिंगे असलेले, अंदाजे ७ ते ८ वर्षे वयाचे दोन बैल | १,०५,०००/- |
| ०२ | निळया रंगाचा, मालवाहतुकीसाठी वापरण्यात येणारा विनानंबरचा टेम्पो (जुनी वापरातील अंदाजित किंमत) | १,८०,०००/- |
| **एकूण** | | **२,८५,०००/-** |

सदरची कारवाई **मा. पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधिक्षक चाळीसगाव, श्री. बापु रोहम, उप विभागीय पोलीस अधिकारी पाचोरा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक प्रविण दातरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गणेश सुस्ते, पोहेकॉ/दीपक पाटील, पोकॉ/ईश्वर कोकणे, पोकॉ/सत्यवान कोळी, पोकॉ/ वैभव देशमुख, व चालक पोहेकॉ/हेमंत सोनवणे यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार दीपक पाटील करीत आहेत.**

************************************************************************